# स्त्री सक्षमीकरण : महात्मा गांधीजींच्या विचारातून

**कांचन जाधव,** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, कमला महाविद्यालय, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना**

भारतीय समाजव्यवस्था ही स्तरीकरणावर आधारित समाजव्यवस्था आहे. त्यामध्ये विविध धर्म, जात, भाषा, प्रदेश,लिंग यानुसार विविधता किंवा विभागणी असली तरी त्यामध्ये एकप्रकारची श्रेणीरचना किंवा उतरंड असलेली आढळून येते. या स्तरीकरणाच्या व्यवस्थेमुळे काही घटक, समूह किंवा समुदाय कायम परीघावर राहिले आणि त्यामुळे त्यांच्या विकासात अनेक अडथळे निर्माण झाले. यामध्ये प्रामुख्याने आदिवासी जमाती, भटक्या जमाती, अल्पसंख्यांक समूह, स्त्रिया, लैंगिक अल्पसंख्यांक समूह हे परीघावर असणारे समूह होत. या परीघावर असणाऱ्या समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अगदी इतिहास काळापासून ते सद्यकाळापर्यंत अनेक आंदोलने, चळवळी, धोरणांची अंमलबजावणी झाली. त्यातीलच भारतीय समाजव्यवस्थेतील दुर्लक्षित किंवा परीघावर असणाऱ्या समूहांपैकी एक गट म्हणजे स्त्रिया होय. पितृसत्ताक भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना कायम दुय्यम स्थान दिले गेले. अनेक वाईट, जाचक रूढी परंपरांच्या त्या बळी पडल्या. अनेक हक्कांपासून त्यांना वंचित ठेवले गेले. स्त्रियांची ही परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक यांनी मोलाचे योगदान दिले. राजाराममोहन  रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांसारख्या अनेक समाजसुधारणावादी सुधारकांनी स्त्रियांची स्थिति सुधारण्यासाठी किंबहुना स्त्री सक्षमीकरणासाठी अथक प्रयत्न केले. त्यामध्ये महात्मा गांधीजींचेही नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते कारण स्त्री-पुरुष समानता, स्त्री सक्षमीकरणाविषयक गांधीजींचेही विचार आणि कार्य महत्त्वाचे आहे.

त्यामुळे सदर लेखामध्ये दुय्यम स्त्रोतांच्या आधारे महात्मा गांधीजींच्या स्त्री सक्षमीकरणाविषयक विचारांचा आढावा घेतला आहे. महात्मा गांधीजींच्या स्त्री सक्षमीकरण किंवा स्त्री-परुष समानतेविषयक विचार समजून घेण्याआधी 'स्त्री सक्षमीकरण' ही संकल्पना समजून घेणे गरजेचे ठरते.

**स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना**

सबलीकरण किंवा सक्षमीकरणाची संकल्पना प्रथमतः १९६० साली अमेरिकेतील काळ्या, जहाल गटांनी मांडल्याचे आढळून येते. भारताच्या संदर्भात विचार करता आर्थिक, सामाजिक दृष्ट्या केलेल्या सुधारणांमधून स्त्री आणि पुरुषांमध्ये स्त्रियांच्या दृष्टीने बदल होणे हे सबलीकरणामध्ये अपेक्षित असते. म्हणजेच सर्वसाधारणपणे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांना हक्क व दर्जा प्राप्त करून देणे, विकासासाठी संधी निर्माण करून देणे आणि स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण म्हटले जाते.

स्त्रियांच्या दृष्टीने समानता निर्माण करण्यासाठी समानतेवर आधारित न्याय असलेला समाज निर्माण करणे, स्त्रियांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न करणे. विकासप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग असावा असे केवळ म्हणून चालणार नाही याची जाणीव जेव्हा निर्माण झाली तेव्हा अर्थव्यवस्थेच्या पातळीवर सक्षमीकरणाची संकल्पना मांडण्यास सुरुवात झाली. कुटुंब, घर तसेच भोवतालची समाजव्यवस्था यांमध्ये समानता, लोकशाहीची मूल्ये जोपासना झाली तरच भारतातील स्त्रियांना प्रौढ होण्यासाठी वाव निर्माण होईल असा सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा आग्रह आहे (आढाव, २००९).

निवडीचे स्वातंत्र्य, वेगवेगळया संधी मिळवण्याचा हक्क, स्त्रियांना त्यांचे खाजगी व सार्वजनिक जीवन नियंत्रित करण्याचा हक्क ज्यावेळी स्त्रियांना मिळतील तेव्हा खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरण होईल असे म्हटले जाते. अशाप्रकारे स्त्री सक्षमीकरण या संकल्पनेचे स्वरूप हे व्यापक असलेले दिसून येते.

**गांधीजींचे स्त्री सक्षमीकरणाविषयक विचार**

राष्ट्रपिता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गांधीजींचे राष्ट्र बांधणी व एकूणच भारताच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रांबाबत गांधीजींचे स्वतंत्र आणि मोलाचे असे विचार होते. या सर्वच क्षेत्रांना वेगळी दिशा देण्याचे कार्य गांधीजींच्या विचारांनी दिले.

त्यातीलच स्त्री-पुरुष समानता, स्त्री-पुरुष नातेसंबंध याविषयीही त्यांचे उदात्त असे विचार होते. त्यांच्या या विचारांचा सखोल अभ्यास केला तर असे लक्षात येते की, स्त्री सक्षमीकरणाची जी व्याख्या आहे किंवा ज्याप्रकारचे स्त्री सक्षमीकरण आज अपेक्षित आहे त्यामध्ये गांधीजींचे स्त्रियांच्या दर्जाविषयकचे विचार अतिशय तंतोतंत लागू होतात. स्त्री- पुरुष समानतेविषयक केवळ मांडणी न करता ते प्रत्यक्ष कृतीतून भारतीय समाजात रुजविण्याचे कार्य गांधीजींनी केले.

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळवून देण्याकरिता गांधीजी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच घटकांतून विचार करताना दिसतात. किंबहुना या सर्व ठिकाणी स्त्रियांना समान दर्जा मिळाला पाहिजे असा आग्रह धरतात. स्त्रियांना मानाचे, सन्मानाचे स्थान मिळावे याविषयक विचार करताना ते स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यापासून सुरुवात करतात. 'सत्याचे प्रयोग' या त्यांच्या आत्मचरित्रामध्ये ते त्यांच्या पत्नी कस्तुरबांविषयी लिहिताना अनेक ठिकाणी माफीचा उल्लेख करतात. कारण पती म्हणून त्यांनी कस्तुरबाजींना कळत नकळत जे दुःख दिले ती चूक ते उघडरीत्या मान्य करतात. त्यात ते लिहितात,

*"कस्तुरबाईने जी मोकळीक घेतली ती मी निर्दोष समजतो. तिच्या मनाला पापाचा स्पर्शही नाही अशी बालिका देवदर्शनाला जायचे किंवा कोणाला भेटायला जायचे, आपल्या गोष्टींवर नियंत्रण का म्हणून सहन करील? मी जर तिच्यावर दडपण घालणार तर तिने माझ्यावर का घालू नये."*

*"मित्राच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन मी माझ्या धर्मपत्नीला कितीतरी दुःख दिलेले आहे. या हिंसेबद्दल मी स्वतःला कधीच क्षमा करणार नाही."* (म. गांधी, अनु. पटवर्धन, २०१०).

यातून गांधीजींची विनम्रता दिसून येते.

स्त्रिया 'अबला' आहेत हे गांधीजींना कधीच मान्य नव्हते. कारण स्त्रियांमध्ये निसर्गतःच सहनशीलता अधिक असते असे ते मानतात. स्त्रियांमध्ये देखील वैचारिक, नेतृत्वगुण असतात. ते कायम द्रौपदी, सावित्री, सीता आणि दमयंती या स्त्रियांचे आदर्श भारतीय स्त्रियांसमोर ठेवत असत. यातून भारतीय स्त्रिया कमकुवत नसून त्या खंबीर, धैर्यवान स्त्रिया आहेत हे सांगण्याचा प्रयत्न ते करत.

गांधीजींच्या मते शिक्षण, रोजगार आणि सामाजिक संरचना यांमध्ये परिवर्तन हे तीन प्रमुख घटक स्त्री सक्षमीकरणाकरता आवश्यक आहेत. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना राजकीय व आर्थिक क्षेत्रात सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले आणि स्त्रियांना भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सामील करून घेतले. कारण पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक अहिंसात्मक पद्धतीने या चळवळी यशस्वी करतील असा त्यांचा दृढ विश्वास होता. अशा रीतीने त्यांनी स्त्रियांना राजकीय प्रक्रियेत सामावून घेतले. यातूनच सरोजिनी नायडू, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, कमला नेहरू, कस्तुरबा गांधी, अरुणा असफ अली, राजकुमारी अमृतकौर, डॉक्टर सुशीला नायर यांसारख्या स्त्रिया नेतृत्व स्थानी आल्या आणि तेथूनच भारतीय स्त्रियांचा सार्वजनिक आणि राजकीय प्रक्रियेत प्रवेश झाला असे म्हणता येईल.

स्त्री सक्षमीकरणासाठीचा महत्त्वाचा असलेला घटक म्हणजे सामाजिक संरचनांमध्ये बदल. याबाबत गांधीजींचे सखोल असे विचार असलेले दिसतात. भारतीय समाजात स्त्रियांना असणारे दुय्यम स्थान, शोषण हे पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे आहे हे गांधीजींनी जाणले होते त्यामुळे त्यांनी खाजगी आणि सार्वजनिक जीवनात स्त्री-पुरुष समानतेचा प्रसार केला पुरुषांप्रमाणेच मालमत्ता, शिक्षण, जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य हे देखील स्त्रियांना मिळावे असा त्यांचा विचार होता. खाजगी जीवनातही स्त्रीला सुरक्षित व मानाचे स्थान मिळावे, स्त्री-पुरुषांचे संबंध हे समानतेवर आधारित असावे यासाठी काही आदर्श मूल्ये ही ते सुचवितात. जसे घरकाम, स्वयंपाक, मुलांचे संगोपन ही केवळ स्त्रीची जबाबदारी न राहता ती पुरुषांचीही असावी प्राथमिक शिक्षणासाठी 'नई तालीम' सारखी बालपोथी जी त्यांनी लिहिली होती त्यातही एक पाठ त्यांनी घरकाम यावर लिहिला होता. स्त्रीला पुरुषांनी भोगवस्तू न मानता तिचा तिच्या शरीरावर पूर्ण अधिकार आहे हे मान्य करून पुरुषांनी ब्रह्मचर्याचे पालन करून स्त्रियांना पुरुषांच्या वर्चस्वातून मुक्त करावे यासारखा विचार व्यक्त करून स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधांना नवी दिशा ते देतात. पती-पत्नीच्या संबंधाविषयी ते म्हणतात, पत्नी पतीची दासी नाही तर त्याची सहचारिणी आहे, सहधर्मीनी आहे. दोघेही

एकमेकांच्या दुःखांचे समान वाटेकरी आहेत आणि जितकी बरे वाईट करण्याची स्वतंत्रता पतीला आहे तितकीच स्त्रीला आहे. या दोघांमध्ये मित्रत्वाचे नाते असावे असा गांधीजींचा विचार होता.

हुंडा प्रथा आणि जातीसंस्था यातील संबंध स्पष्ट करून हुंडा प्रथा संपुष्टात आणण्यासाठी आंतरजातीय विवाह हा एक उपाय ते सुचवतात कारण जाती अंतर्गत विवाहामधूनच हुंडा प्रथेसारख्या प्रथांना अधिक चालना मिळते त्यामुळे आंतरजातीय विवाह अधिक होत गेले तर यासारख्या प्रथा नष्ट होतील असा आशावाद गांधीजींना होता त्याबरोबरच विवाह सारख्या गोष्टीवर अनाठायी अधिक खर्च करणे या गोष्टीला देखील ते विरोध करतात विनाकारण खर्च न करता साधेपणाने विवाह करावेत असा त्यांचा आग्रह असे. भारतीय संस्कृती व हिंदू धर्मशास्त्र याविषयी आदर असला तरी ज्या धार्मिक प्रथा, रुढी, परंपरा यातून स्त्रियांचे शोषण होते. त्यांच्या दुय्यम स्थानाला बळकटी मिळते अशा रूढी परंपरांचा त्यांनी कडाडून विरोध केला. पडदा पद्धती, बालविवाह, हुंडा प्रथा, देवदासी, सती प्रथा, बहुपत्नीत्व, बाला-जरठ विवाह या प्रथांचा त्यांनी निषेध केला तसेच स्त्रियांच्या विवाह न करण्याच्या इच्छेचा किंवा अधिकाराचा देखील सन्मान आणि आदर त्यांनी केला त्याचबरोबर मातृत्व हेच स्त्रीचे सर्वस्व नाही तर त्याहीपेक्षा समाजसेवा श्रेष्ठ आहे हे सांगून स्त्रियांवरील मातृत्वाचे बंधन ते नाकारतात.

त्याचबरोबर पुरुषांनी स्त्रियांवर मालकी हक्क गाजवू नये आणि स्त्रियांनीही पुरुषांचे गुलाम बनण्याची गरज नाही. ज्यावेळी पुरुषांकडून स्त्रियांवर आक्रमण होईल त्यावेळी स्त्रियांनी हिंसा की अहिंसा या तत्त्वांचा विचार न करता त्योग्य तो प्रतिकार करावा त्यावेळी आत्मसंरक्षण यावर स्वतःचे लक्ष केंद्रित करावे असे गांधीजींना वाटे. म्हणजेच जेथे स्त्रियांचा आत्मसन्मान आणि न्यायाचा प्रश्न उभा राहतो त्यावेळी गांधीजी त्यांची ही तत्वे बाजूला ठेवण्याचीही मुभा देतात.

स्त्री सक्षमीकरणातील शिक्षण या घटकाकडे देखील गांधीजी लक्ष वेधतात गांधीजींच्या मते शिक्षण आणि ज्ञान मिळाल्याशिवाय स्त्रियांना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मानाचे स्थान मिळणार नाही तसेच शिक्षण घेतल्याशिवाय त्या आत्मनिर्भरही होऊ शकत नाही त्यामुळे स्त्रियांना शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे.

'यंग इंडिया' या लेखात ते नमूद करतात की, मुलींनी भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी भाषेतीलही साहित्य वाचावे. स्त्रियांनी शिक्षण हे स्व विकास आणि आर्थिक दृष्ट्या निर्भर होण्यासाठी घ्यावे ते केवळ विवाह योग्य जोडीदार मिळवण्या पुरते नसावे (देशपांडे,२००९).

अशाप्रकारे स्त्री-पुरुष समानता विचार गांधीजींनी मांडून वेगवेगळया कृती योजना कार्यक्रमांद्वारे ते भारतीय समाजात रुजवण्याचे कार्य केले.

**स्त्री सक्षमीकरणावरील गांधीजींच्या विचारांवरील चिकित्सात्मक समीक्षा**

स्त्रियांच्या सबलीकरणाविषयी किंवा स्त्री पुरुष समानतेविषयी गांधीजींचे विचार महत्त्वाचे असले तरी अनेक अभ्यासकांनी त्यांच्या विचारांची चिकित्सक समीक्षा देखील केली आहे. स्त्रीवादी दृष्टीकोनातून म्हटले गेले आहे की, गांधीवादी चळवळी पितृसत्ताक संस्थांना आव्हान देण्यास अपयशी ठरल्या आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासक असलेल्या सुजाता पटेल यांच्या मते, गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळींमध्ये मुख्यतः मध्यमवर्गीय, उच्च जातीय स्त्रियांचाच सहभाग अधिक होता. स्त्रिया घरातील जीवनासाठी जैविकदृष्ट्या अधिक अनुकूल आहेत. गांधीजींच्या या दाव्यावर टीका करताना त्या म्हणतात की, यासंदर्भात गांधीजींची समज उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गीय पुरुषांसारखी होती, ज्यांची आदर्श स्त्री घरात बंदिस्त होती. मात्र त्याच काळात अनेक भारतीय स्त्रिया उपजीविका चालविण्यासाठी शेत मजूर आणि कारखान्यात मजूर म्हणून काम करत होत्या या गोष्टीकडे गांधीजी दुर्लक्ष करतात. तसेच आर्थिकरित्या स्वतंत्र असलेल्या स्त्रियांना चळवळींमध्ये स्थान देण्यात गांधीजी अपयशी ठरतात (हार्डीमन, २००३).

**समारोप**

अशाप्रकारे गांधीजींच्या विचारांवर अभ्यासकांनी टिका केली असली तरी, गांधीजींनी स्त्री पुरुष समानतेविषयी जे विचार मांडले; त्या विचारांना मर्यादा असल्या तरी, त्या काळात स्त्री पुरुष समानतेविषयी जे विचार त्यांनी मांडले त्यामुळे तरी भारतीय पितृसत्ताक समाजात स्त्री पुरुष समानतेच्या विचारांना किमान सुरुवात झाली असे

म्हणता येईल. तसेच गांधीजींच्या प्रयत्नामुळे स्त्रिया सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात प्रवेश करू शकल्या. यामुळे स्त्री सक्षमीकरणाची जी व्याख्या आहे, त्यामध्ये गांधीजींचे विचार तंतोतंत लागू होतात. त्यांच्या विचारांची गरज आजच्या आधुनिक काळात देखील आहे. कारण समकालीन समाजात स्त्रिया प्रगती पथावर वाटचाल करीत असल्या तरी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. आजही लिंगनिदान करून गर्भपात केले जात आहेत, बलात्कार करून क्रूर पद्धतीने हत्या केल्या जात आहेत, शिक्षणातील प्रमाण वाढलेले दिसत नाही. त्यामुळे आजच्या सद्यस्थितीत गांधीजींच्या अहिंसा या तत्वावर आधारित विचारांची गरज आजच्या सद्यस्थितीतील भारतीय समाजाला आहे.

**संदर्भसूची:**


- आढाव, वि. (२००९). महिला सबलीकरण. पुणे विद्यापीठ.
- Barman, P. (2013). Gandhi and His Vision for Women Empowerment. *International Journal of Computer Applications in Engineering Sciences*, *3*, 41.
- Basheer, R. P. (2018). Empowerment of women through education: a special reference to Mahatma Gandhi. *International J Res Anal Rev*, *5*(3), 1756-1758.
- बेडकिहाळ, कि. (संपा.). (२०२२). गांधींविषयी: गांधी: जीवन आणि कार्य. खंड १.साधना प्रकाशन.
- Campbell, D., & Dass, P. L. (2019). Mahatma Gandhi's Thoughts on Women Empowerment and Present Scenario. *Think India Journal*, *22*(10), 7588-7597.
- Doley, H. (2020). Relevance of Mahatma Gandhi's Ideas on Women Empowerment. International Journal of Scientific & Technology Research. Vol. 9, Issue 04. 1541-1544.
- देशपांडे, सु. (२००९). गांधीजींचा स्त्रीविषयक दृष्टीकोन व सामाजिक समता. जाधव, श्री. (संपा.). गांधीजी आणि सामाजिक समता. महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय. औरंगाबाद, ९३-९९.
- गांधी, मो. पटवर्धन, सी. (अनु.).(२०१०). सत्याचे प्रयोग. नवजीवन मुद्रणालय.
- Hardiman, D. (2003). Gandhi in his time and ours. Permanent Black. Delhi.
- Kishwar, M. (1985). Gandhi on women. *Economic and Political Weekly*, 1691-1702.
- Mukhopadhyay, J. MAHATMA GANDHI'S CONTRIBUTION TO WOMEN'S EMPOWERMENT IN INDIA. Retrieved from: https://www.researchgate.net/profile/MudasirTantray/publication/337832225_LANGUAGE_AND_EDUCATION_A_CRITICAL_APPROACH_TO_GANDHI_AND_WITTGENSTEIN/links/5dee2888a6fdcc2837122cba/LANGUAGE-AND-EDUCATION-A-CRITICAL-APPROACH-TO-GANDHI-AND-WITTGENSTEIN.pdf#page=48
- पाटील, प्र. (२००९). महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार. जाधव, श्री. (संपा.). गांधीजी आणि सामाजिक समता. महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय. औरंगाबाद, १०६-१११.
- पटेल, र. (२०१९). गांधीविचारातील स्त्री-स्वातंत्र्य. दैनिक लोकसत्ता. ८ मार्च २०१९.